# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१९–२०/७७
दिनांक –२५ फेब्रुवारी,२०२०

परिपत्रक :–

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित मानव्यशास्त्र (Humanities), विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology), वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) आणि आंतरविद्याशाखा (Interdisciplinary) शाखेतील सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था प्रमुख/संचालक, स्वायत्त महाविद्यालये व अल्पसंख्यांक महाविद्यालये तसेच विद्यापीठाचे सर्व विभागप्रमुख/संचालक यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक : शिष्यवृत्ती २०१८/प्र.क्र.२४२/शिक्षण दिनांक १३ फेब्रुवारी, २०२० नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणा–या व मुंबई विद्यापीठाशी संलग्न असणा–या महाविद्यालयातील सर्व अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यायसायीक व बिगर व्यवसायीक अभ्यासक्रमासाठी विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तसेच अनुदानित महाविद्यालयातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती करावयाच्या इतर शुल्काबाबतच्या (other fees) बाबी निश्चित करून महाडिबीटी पोर्टल वर अपलोड करणेबाबत शासन निर्णय सोबत जोडला आहे.

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त शासन परिपत्रकानुसार नमुद परिच्छेद २ मध्ये नमुद १६ बाबींचा शुल्काची अचूक परिगणना करून बाबनिहाय शुल्क अंतिम करून सदर शुल्क हे सक्षम प्राधिकरण/प्राधिकारी/प्रशासकीय विभाग यांच्या मान्यतेने महाडिबीटी पोर्टलवर अपलोड केल्याचे संबंधित महाविद्यालयाने प्रमाणित करणे अनिवार्य राहील. इतर शुल्कामध्ये समाविष्ट १६ बाबीपैकी एखादया बाबीचे शुल्क अवास्तव असल्याचे तसेच सदर शुल्कास सक्षम मान्यता नसल्याचे निदर्शनास आल्यास व त्याद्वारे शासनाचे आर्थिक नुकसान झाल्यास संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व्यक्तिशः जबाबदार धरून आर्थिक फसवणूक केल्याबद्दल नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक आणि शासन निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.mu.ac.in) उपलब्ध आहे.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :–
सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित मानव्यशास्त्र (Humanities), विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology), वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) आणि आंतरविद्याशाखा (Interdisciplinary) शाखेतील सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था प्रमुख/संचालक, स्वायत्त महाविद्यालये व अल्पसंख्यांक महाविद्यालये तसेच विद्यापीठाचे सर्व विभागप्रमुख/संचालक.

(डॉ. अजय देशमुख)
कलसचिव

विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती करावयाच्या इतर शुल्काच्या (other fees) बाबी निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इमाव,सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती २०१८/ प्र.क्र. २४२/ शिक्षण
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०२०

संदर्भ :
१) शासन निर्णय, सा.न्या. सा.का.क्रि व वि.स. विभाग क्र. इबीसी-२००३/प्र.क्र.३०१/ मावक दि.१ नोव्हेंबर,२००३
२) शासन निर्णय, सा.न्या. सा.का.क्रि व वि.स. विभाग क्र. इबीसी-२००४/प्र.क्र.३०/ मावक-२, दि.५ जानेवारी,२००५.
३) शासन परिपत्रक सा.न्या.सा.का.क्रि व वि.स. विभाग क्र. इबीसी-२००५/प्र.क्र.१२८/ मावक-२, दि.२७ जून, २००५.
४) शासन परिपत्रक, इमाव,सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग क्र. इबीसी-२०१७/ प्र.क्र.४५/शिक्षण, दि.५.१२.२०१८.
५) विजाभज संचालनालय, पुणे यांचा दि.२९.१०.२०१८ चा प्रस्ताव.
६) शासन परिपत्रक इमाव,सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग, क्र. शिवृत्ती २०१८/ प्र.क्र.२४२/ शिक्षण, दिनांक १४ मार्च,२०१९.

प्रस्तावना:-

अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये कला, विज्ञान आणि वाणिज्य या शाखांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना तसेच अनुदानित महाविद्यालयातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयाच्या संबंधित विद्यापीठाने ठरविलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, ग्रंथालय शुल्क, इतर शुल्क, एक्स्ट्रा क्युरिक्युलर ॲक्टीव्हिटीज, मॅगेझीन फी, नोंदणी शुल्क, कॉम्प्युटर प्रॅक्टिकल शुल्क व परीक्षा शुल्क याची महाविद्यालयाला प्रतिपूर्ती करण्याच्या सूचना संदर्भ क्र.३ येथील दि.२७ जून, २००५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या होत्या. तसेच संदर्भ क्र. ६ अन्वये शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. सदर शासन परिपत्रकामध्ये सुधारणा करण्याची बाब शासन विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

सन २००५-०६ पासूनच्या कालावधीमध्ये महाविद्यालयांमार्फत राबविण्यात येत असलेल्या वैविध्यपूर्ण उपक्रमांमुळे इतर शुल्कांच्या बाबींमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे इतर शुल्कांच्या बाबनिहाय फीमध्ये देखील महाविद्यालय/ विद्यापीठनिहाय मोठया प्रमाणावर भिन्नता दिसून येत आहे. याबाबत संचालक, इमाव, संचालनालय, पुणे यांनी संदर्भ क्र.५ येथे नमूद दि.२९.१०.२०१८ रोजीच्या पत्राद्वारे शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. ही बाब विचारात घेऊन इतर शुल्कांच्या बाबी नेमक्या कोणत्या असाव्यात याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने सर्व महाविद्यालयाकडून माहिती मागवून इतर शुल्काच्या १६ बाबी निश्चित केल्या आहेत. सदर १६ बाबी महाडिबीटी पोर्टलवर अपलोड करण्यात आल्या आहेत. सर्व प्रशासकीय विभागांसाठी इतर शुल्काच्या १६ बाबी निश्चित करण्यात आल्या असल्यामुळे माहिती व तंत्रज्ञान विभागाने महाडिबीटी पोर्टलवर अपलोड केलेल्या इतर शुल्काच्या खाली नमूद १६ बाबींसाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात यावी. खालील नमूद **१६ इतर शुल्काच्या बाबी ह्या अनुदानित व विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक व बिगर**

**व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सुद्धा लागू राहतील.** FRA ने शुल्क निर्धारण करताना त्यामध्ये इतर शुल्काचा समावेश केलेला नाही याची खात्री करण्यात यावी. तसेच इतर शुल्काचे दुबार प्रदान होणार नांही याची देखील दक्षता घेण्यात यावी. शासन परिपत्रक दि.५.१२.२०१८ मधील मुद्दा क्र. २ (६) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठीची दोन्ही सहामाहीची अनुज्ञेय असलेली इतर फी एकत्रितरित्या द्वितीय सहामाहीमध्ये देणेबाबत सदर्भ क्र. ०६ च्या परिपत्रकान्वये सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| I) प्रवेश फी | II) विविध गुणदर्शन उपक्रम शुल्क (Extra Curriculum /Activity fee) | III) विद्यापीठ विकास निधी | IV) विद्यापीठ विद्यार्थी सहाय्य निधी/ कल्याण निधी |
| V) प्रयोग शाळा शुल्क | VI) कॉलेज मॅगेजीन फी | VII) विद्यापीठ क्रिडा निधी | VIII) विद्यापीठ विद्यार्थी विमा निधी |
| IX) ग्रंथालय शुल्क | X) संगणक प्रशिक्षण फी | XI) विद्यापीठ अश्वमेध निधी | XII) युथ फेस्टीवल शुल्क |
| XIII) जिमखाना शुल्क | XIV) नोंदणी शुल्क | XV) विद्यापीठ वैद्यकिय मदत निधी | XVI) विद्यार्थी ओळखपत्र शुल्क |

उक्त परिच्छेद -२ मध्ये नमूद १६ बाबींच्या शुल्काची अचूक परिगणना करुन बाबनिहाय शुल्क अंतिम करुन सदर शुल्क हे सक्षम प्राधिकरण / प्राधिकारी /प्रशासकीय विभाग यांच्या मान्यतेने महाडिबीटी पोर्टलवर अपलोड केल्याचे संबंधित महाविद्यालयाने प्रमाणित करणे अनिवार्य राहील. इतर शुल्कामध्ये समाविष्ट १६ बाबींपैकी एखाद्या बाबीचे शुल्क अवास्तव असल्याचे तसेच सदर शुल्कास सक्षम मान्यता नसल्याचे निदर्शनास आल्यास व त्याद्वारे शासनाचे आर्थिक नुकसान झाल्यास संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व्यक्तिशः जबाबदार धरुन शासनाची आर्थिक फसवणूक केल्याबद्दल नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद द्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२००२१३१५३२२९८२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

RAVINDRA VASANTRAO GURAV

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर सचिव
३. मा.मंत्री, इमाव,सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री, इमाव,सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव,मंत्रालय, मुंबई
६. मा.प्रधान सचिव, महसुल व वन/वित्त / नियोजन /ग्रामविकास/ गृह निर्माण/ उद्योग,उर्जा व कामगार/ उच्च व तंत्रशिक्षण/ माहिती व तंत्रज्ञान/ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये/ कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. मा.प्रधान सचिव, इमाव,सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय, मुंबई
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रशिध्दीसाठी)
९. संचालक, इमाव,सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

१०. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, मुंबई
११. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
१२. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग
१३. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१४. निवड नस्ती (शिक्षण).